# " प्रेसनोट "

## "दरोडा, घरफोडी करणारे सराईत गुन्हेगार गजाआड"

दिनांक-१४/३/२०१९ रोजी नवघर पो.ठाण्याचे पोलीस अधिकारी व कर्मचारी गस्त फिरत असतांना त्यांना नवघर पो.ठाण्याचे हद्दीतील इंद्रलोक येथील बाजारपेठ बंद होण्याचे वेळेस मुंबई मालवणी येथे राहणारा सराईत गुन्हेगार इम्रान अन्सारी हा त्याचे इतर साथीदार यांचेसह इद्रलोक ते कनकीया रोड लगत असलेल्या शिववंदना बिल्डीग मधिल धन लक्ष्मी ज्वेलर्सवर दरोडा टाकण्यासाठी येणार असल्याची खात्रीशिर बातमी मिळाल्याने, नवघर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पो.निरी. राम भालसिंग यांनी सदरची माहिती मा.पो.अधीक्षक सो, मा.अपर पो. अधीक्षक सो, ठाणे ग्रामीण मा.सहा.पो.अधीक्षक, भाईंदर विभाग श्री.अतुल कुलकर्णी यांना दिली. सदर वेळी वरिष्ठ अीकारी यांचे मार्गदर्शनाखाली छाप्याची योजना तयार करुन माहितीप्रमाणे सापळा लावण्यात आला.

दिनांक १४/०३/२०१९ रोजी २३.५० वाजताचे सुमारास स्व. बाळासाहेब ठाकरे मैदान, इंद्रलोक भाईंदर पुर्व या ठिकाणी आरोपी क्रं. १) मोहमद युसुफ याकीब शेख, वय ३२ वर्षे, व्यवसाय कपडे विक्री, रा. रुम नं. ३०३ ड्रिम हाउस सोसायटी नालासोपारा गांव नालासोपारा पश्चिम ता. वसई जि. पालघर, २) राजकुमार उर्फ राजन सिपरवायझर गुप्ता, वय १८ वर्षे, व्यवसाय मजुरी, रा. भारत एकता सोवा सोसायटी सौराब कंपाउड राठोडी गांव मालवणी पश्चिम मुंबई, ३) टिप्पु नुरअहमद शेख, वय २७ वर्षे, व्यवसाय कारपेंटर, रा. रुम नं. १५ बिस्मीला सोसायटी. आजमीनगर मालवणी पश्चिम मुंबई, ४) मुक्तारअहमद जमीरअहमद कुरेशी, वय २९ वर्षे, व्यवसाय मोबाईल दुकान, रा. रुम नं. ४०३, चांमुडा बिल्डींग फनफिस्टा सिग्नल जवळ नालासोपारा पुर्व, ता. वसई, जि. पालघर हे मिळुन आले व आरोपीत क्रमांक ०५) इम्रान मोहम्मद बिंदु अन्सारी, रा. मालवणी मुंबई हे त्यांचे कब्जात गावठी बनावटीचा लोखंडी कट्टा, लोखंडी सुरा, स्क्रु ड्रायव्हर, लोखंडी पकड, मिरची पावडर, नायलॉन रस्सी अश्या प्राणघातक वस्तु कब्जात बाळगुन दोन मोटार सायकलवर बसुन येवून दरोडा टाकण्याचे तयारीत असतांना त्यांचेवर छापा टाकला असता ते पळून जाऊ लागले. त्यांचा पाठलाग करुन एकूण ४ आरोपी पकडले व १ आरोपी इम्रान अन्सारी पळून गेला. सदर घडलेल्या प्रकाराबाबत स.पो.उप-निरी. बी.वही. राठोड यांनी दिलेल्या तक्रारीवरुन नवघर पो.ठाणे येथे गुरनं I ७०/२०१९ भा.दं.वि. कलम ३९९,४०२ सह आर्म ॲक्ट ३,५,७,२५ प्रमाणे अन्वये गुन्हा दाखल आहे. सदर गुन्हयांचे तपासात आरोपी यांनी गॅस कटरचा वापर करुन, बंद दुकानाचे शटर व ग्रिल हे कापून त्यावाटे आत प्रवेश करुन, दुकानातील मोबाईल घरफोडी चोरी नेल्याची कबुली दिली आहे. तसेच अटक आरोपी यांचेकडून नवघर पोलीस ठाणे, काशिमीरा पो.ठाणे, वालीव पो.ठाणे व इतर पो.ठाणे येथे केलेल्या घरफोडी चोरी मधील एकूण-३,३९,८००/- रुपयाचे मोबाईल व ३,००,०००/-रुपये किंमतीचे एकूण-०६ लॅपटॉप व गुन्हा करताना वापरत असलेले एक छोटा गॅस सिलेंडर बाटला, एक छोटा ऑक्सीजन बाटला व गॅस कटर हस्तगत करणेत आला आहे.

सदरची कामगिरी मा.श्री.शिवाजी राठोड, पोलीस अधीक्षक, ठाणे ग्रामीण, मा.श्री.संजय पाटील, अपर पोलीस अधीक्षक, ठाणे ग्रामीण, मा.श्री. अतुल कुलकर्णी, सहाय्यक पोलीस अधीक्षक, भाईंदर विभाग, व वरिष्ठ पोलीस निरीक्षक, राम भालसिंग, नवघर पोलीस ठाणे यांचे मार्गदर्शनाखाली नवघर पोलीस ठाण्याचे सहा.पो.निरी. टिकाराम थाटकर, पोलीस उप निरीक्षक, विजय टक्के, पोना/भालेराव,पोशि/चेतनसिंग राजपुत,चापोशि/जितेंद्र निवळे, पोशि/गिरगावकर, पोशि/माने व खास पथक स्था.गु.शाखेचे व.पो.नि. व्यंकट आंधळे, सपोनि/प्रमोद बडाख, पोहवा/अर्जुन जाधव व स्टाफ यांनी केलेली असुन, सदर गुन्हयांचा तपास स.पो.नि. टिकाराम थाटकर हे करीत आहेत.

-------------ooooo--------------